## आदेश नि. यु-१

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दाखल केला असून असे प्रतिपादन केले आहे की, या प्रकरणात त्यांच्याविरूध्द 'लेखी कैफियत नाही' असा आदेश पारित करण्यात आला होता. परंतु, आजरोजी प्रतिवादी हजर असून अभिलेखावर लेखी कैफियत दाखल करण्यास तयार आहेत. त्यामुळे त्यांना लेखी कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येवून प्रस्तुतचा आदेश मंजूर करण्यात यावा.

२) प्रस्तुतच्या प्रतिवादींच्या अर्जावर अर्जदारांनी जोरदार हरकत नोंदवून असे कथन केले आहे की, मुळातच, प्रतिवादींविरूध्द 'लेखी कैफियत नाही' असा आदेश पारित होवून बराच काळ झालेला आहे आणि आजरोजी प्रतिवादी अभिलेखावर लेखी कैफियत दाखल करण्याची परवानगी मागत आहेत परंतु, त्यांच्या अर्जात कोणतेही गुण आढळून येत नाहीत. त्यामुळे हा अर्ज पुर्णपणे फेटाळून लावण्यात यावा.

३) दोन्ही पक्षांचे कथन आणि अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, प्रतिवादी ब-याच विलंबाने लेखी कैफियत दाखल करत आहेत परंतु, त्यांना परवानगी दिली नाही तर प्रस्तुतचे प्रकरणात गुणदोषावर न्यायनिर्णय पारित होवू शकणार नाही. म्हणून न्यायासाठी प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत असून अभिलेखावर लेखी कैफियत दाखल करण्याची त्यांना परवानगी देण्यात येत आहे.

स्वा/-

**दिनांक :- १४.१०.२०२४** **(शार्दुल श. जहागीरदार)**
**न्यायाधीश,**
**ठिकाण :- बुलढाणा.** **कामगार न्यायालय, बुलढाणा.**